


# दिव्य वार्ता



मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा....

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- मंगळवार दि. १४ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# आकावर लागला मकोका

# वाल्मिक कराडवर आली संक्रांत



## समर्थक आक्रमक, सर्वत्र शुकशुकाट, परळी बंद

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली. या घटनेला आता एक महिना उलटून गेला आहे. प्रकरण चांगलंच तापलं आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणात आतापर्यंत आठ आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. मात्र या प्रकरणात वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली नव्हती. वाल्मिक कराड याच्यावर देखील मकोका अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी संतोष देशमुख यांच्या कुटुंबाकडून सुरू होती. वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी सोमवारी मस्साजोगमध्ये पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख देखील सहभागी झाले होते. दरम्यान जर वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई नाही झाली तर आत्मदहन करू असा इशारा मस्साजोगच्या ग्रामस्थानी दिला होता. त्यानंतर आता मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. वाल्मिक कराडवर कारवाई करण्यात आल्यानंतर वातावरण चांगलंच तापलं असून, परळीमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे. परळीमधील सर्व दुकानं बंद करण्यात आली आहेत.

## माझा लेक देवमाणूस हे सगळ्या परळीला माहिती

### माझ्या लेकाला निर्दोश सोडावं त्याला मुद्दाम या सर्व प्रकरीणात अडकवलं जाते

### वाल्मिक कराड यांच्या मातोश्री पारूबाई कराड यांचे भावनिक शब्द

वाल्मिक कराड सध्या दोन कोटींच्या खंडणी प्रकरणात अटकेत आहे. मंगळवारी (ता.१४) त्याची १४ दिवसांची पोलिस कोठडी संपत असल्यामुळे त्याला केज येथील सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं आहे. मात्र, वाल्मिक कराडवर केवळ खंडणीचा नव्हे तर हत्येचा गुन्हाही दाखल करावा अशी मागणी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केली आहे.


शिवाय कराड हाच या हत्या प्रकरणाचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप देखील देशमुख कुटुंबियासह भाजप आमदार सुरेश धस यांच्याकडून केला जात असतानाच वाल्मिक कराडच्या आई पारूबाई कराड यांनी सुरेश धस यांच्यासह संदीप क्षीरसागर आणि खासदार बजरंग सोनवणे यांच्यावर गंभीर पान २ वर

### वाल्मिक कराडच्या समर्थनार्थ महिलांचा आत्मदहनाचा प्रयत्न!









# ‘आका’चा गेम ओव्हर ?

## देशमुख प्रकरणात कोणताही दोषी सुटणार नाही-आ.सुरेश धस

मुंबई: मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडभोवती कारवाईचा फास आणखीच घट्ट झाला आहे. एसआयटीकडून देशमुख हत्या प्रकरणात मकोका लावण्यात आला आहे. वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी आपली पहिली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. संतोष देशमुख प्रकरणात कोणताही दोषी सुटणार नसल्याचा विश्वास सुरेश धस यांनी सांगितले.



वाल्मिक कराड याची सीआयडी कोठडी आज संपली. त्यानंतर आज कोर्टासमोर त्याला हजर करण्यात आले. यावेळी सरकारी वकिलांनी आणि कराडच्या वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला. आजच्या सुनावणीनंतर कोर्टाने खंडणीच्या गुन्ह्यात वाल्मिक कराडला १४ दिवसांची न्यायलयीन कोठडी सुनावली. त्यामुळे वाल्मिक कराडला दिलासा मिळेल अशी शक्यता होती. मात्र, एसआयटीने कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल असून कराडचा ताबा मागितला. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता वाल्मिक कराडलाही आरोपी करण्यात येणार आहे.

भाजपचे आमदार सुरेश धस यांनी मुंबईत बोलताना दोषींवर कारवाई होईल असा विश्वास व्यक्त केला. सुरेश धस यांनी म्हटले की, या प्रकरणातील गुन्ह्यात वाल्मिक कराड हा आरोपी आहे की आणखी कोण ▶▶ पान २ वर

### वाल्मिक कराडांचा खंडणी आणि खून प्रकरणात सहभाग नाही

## आंदोलनाने वेठीस धरून गुन्हा दाखल

बीड : वाल्मिक कराड याच्यावर हत्येच्या कटात सहभागी असल्याचा ठपका ठेवून ‘मकोका’न्वये कारवाईचे पाऊल राज्य सरकारने उचलल्यानंतर त्याच्या बायकोने अतिशय आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणात निव्वळ जातीयवाद होत आहे. कोणतेही पुरावे नसताना त्यांच्यावर (वाल्मिक कराड) केवळ दबावातून कारवाई केली जात आहे. हे अतिशय अयोग्य आहे, असे वाल्मिक कराडच्या पत्नीने म्हटले.

वाल्मिक कराडची पोलीस कोठडी संपल्याने त्याला केज न्यायालयासमोर मंगळवारी हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. मात्र एसआयटीच्या तपास अधिकाऱ्यांनी वाल्मिकचा खून प्रकरणात आणि कटात सहभाग असल्याचा ठपका ठेवला. खून प्रकरणात त्याची चौकशी होणे गरजेचे आहे, अटकेत असलेल्या इतर आरोपींकडून महत्त्वाची माहिती आम्हाला मिळाली आहे, असे तपास ▶▶ पान २ वर

### वाल्मिक कराडसाठी महिलांनी

## अंगावर पेट्रोल ओतून

### आत्मदहनाचा केला प्रयत्न!

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराडची मोक्का अंतर्गत कारवाई होणार आहे. तसेच आज वाल्मिक कराडच्या न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आज परळीत वाल्मिक कराडच्या समर्थनासाठी कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत.खंडणी प्रकरणात अटकेत असलेला आरोपी वाल्मिक कराड याच्या समर्थनासाठी परळी शहरामध्ये जोरदार आंदोलन सुरू झालं आहे. ▶▶ पान २ वर

# धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा-आ.संदीप क्षीरसागर

बीड, (दिव्य न्युज):- धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याशिवाय वाल्मिक कराड याच्यावर कारवाई होणार नाही. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड हे मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर डील करण्यासाठी गेले होते. याठिकाणी नोटा मोजतानाचे त्यांचे फोटो समोर आले आहेत, असे वक्तव्य बीड शहरचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले. मी पहिल्या दिवसापासून सांगतोय, संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड आहे. सगळ्या लोकांचे सीडीआर तपासल्यास ही गोष्टी समोर येईल. मात्र, वाल्मिक कराड यांच्यावर हत्येचे कटकारस्थान रचल्याप्रकरणी ३०२ चा गुन्हा दाखल का केला जात नाही, असा सवाल संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला.



संतोष देशमुखांचा एक मारेकरी फरार आहे. धनंजय मुंडे मंत्री असल्यामुळे हा विषय होतोय. सह्याद्री अतिथीगृहावर नोटा मोजतानाचे फोटो समोर आले आहेत. सह्याद्रीसारख्या ठिकाणीही वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे डिलिंग करण्यासाठी बसतात. यावरुन तुम्हाला सगळ्या प्रकाराची कल्पना येईल. नैतिकतेच्या आधारावर धनंजय मुंडे यांचा राजीनामाच घेतला पाहिजे. सीडीआरच्या आधारे तपास झाला पाहिजे. वाल्मिक कराडला फाशी झाल्याशिवाय स्थानिक जनता आणि आम्ही ▶▶ पान २ वर

# ‘मी यापुढे विधानसभा निवडणूक लढणार नाही’

## आमदार अब्दुल सत्तारांची घोषणा

सिल्लोड, (दिव्य न्युज):- राज्याच्या राजकारणात नेहमी चर्चेत राहणारे शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांनी यापुढे निवडणूक न लढवण्याची घोषणा केली आहे. अंभई येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना सत्तार म्हणाले की, 'मी आमदार-मंत्री असताना १८-१८ तास सालदार महिनदार सारखे काम केले. शासकीय योजनेचा लाभ अनेक महिलांना व कामगारांना मिळवून दिला, मतदारसंघाचा विकास केला, पण शेवटी जाती पातीवर निवडणूक झाली व माझा विजय २४२० मतांनी झाला. लोकांना विकास नकोय, जाती पातीवर निवडणुका होत असतील तर आगामी सिल्लोडची नगर परिषद माझी शेवटची निवडणूक राहील. मी यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही,' अशी घोषणा त्यांनी केली आहे.



सत्तार पुढे म्हणतात, 'मी मतदारसंघाचा विकास केला, पण शेवटी जाती पातीवर निवडणूक झाली, लोकांना विकास नकोय, तर जाती पातीवर निवडणुका हव्यात. आगामी सिल्लोडची नगर परिषद माझी शेवटची निवडणूक राहील, मी यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही. कामगारांची नोंदणी करण्यासाठी यंत्रणा राबवली, सिल्लोड सोयगाव मतदार संघाचा विकास केला, सूतगिरणी, मेडिकल कॉलेज, एमआयडिसी आणली. शेतकरी बागायतदार व्हावा, यासाठी पूर्णा नदीवर बेरिजेस बांधण्याच्या कामाला मंजुरी घेतली.'

सत्तारांचा मुलगा निवडणूक लढवणार?

'आमदार व मंत्री असतांना कोट्यवधी रुपयांचा निधी आणला. पण, विरोधक काहीच कामे न करता, त्यांना माझ्याबरोबरीने मतदान मिळते. विरोधक जाती पातीवर ▶▶ पान २ वर

# जगदंब कॉलनीत कचऱ्याचे ढिग

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात



बीड, (दिव्य न्युज):- स्वच्छ व सुंदर शहर या पालिकेच्या घोष वाक्याला पालिकेनेच हरताळ फासल्याचे समोर आले आहे. शहरातील चक्रधर नगर, सौभाग्य लॉन्स समोरील जगदंब कॉलणीचा अक्षरशः उकीरडा झाला आहे. मात्र पालिकेला हा उकीरडा दिसेनासा झाला आहे. परिसरात कचर्याचे ढिगारे साचू ▶▶ पान २ वर

# चालू बसचे उडाले छत

नेकनुर , (दिव्य न्युज):- विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी निघालेल्या बसचा वरचा टफ चालत्या बसमध्ये निघाला, अशा खिळखिळ्या झालेल्या बस विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी एसटी महामंडळ वापरत असेल तर विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका आहे. ही बस बीड- मुंडेवाडी येथून बाळनाथ विद्यालय चाकरवाडी, बळवंतराव कदम विद्यालय येळब घाट, जिल्हा परिषद शाळा वाघेबाबुळगाव या ठिकाणच्या विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्यासाठी जात असताना नेकनुरजवळ रत्नागिरी फाट्या जवळ गाडीचा टप उडाला सदरील गाडीत कोणीच ▶▶ पान २ वर



# वीज थकबाकी सवलतीत भरा, नाही तर जेलची तयारी ठेवा

## अभय योजना : थकबाकीदार ग्राहकांसाठी ३१ मार्चपर्यंत संधी

दिव्य न्युज

**बीड :** वर्षानुवर्षे विजेची थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांसाठी महावितरण विभागाने वसुली मोहिमेला जोर धरला आहे. ३१ मार्चपूर्वी रितसर महावितरणचे अधिकारी-कर्मचारी वसुलीसाठी प्रयत्न करणार आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेचा मालक, खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करावे लागतील, वेळप्रसंगी ग्राहकांना तुरुंगात जाण्याची तयारी ठेवा लागणार आहे.

बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरूपी तोडलेल्या घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू असलेल्या अभय योजनेसाठी ३१ डिसेंबर शेवटची तारीख होती. मात्र, ग्राहकांच्या मागणीनुसार यात आणखी वाढ करण्यात आली आहे.




### अभय योजनेत सवलत काय?

- थकबाकीदारांना अभय योजनेत आता ३१ मार्चपर्यंत मुदत मिळाली आहे. त्याचबरोबर थकीत बिलाच्या रकमेपैकी सुरुवातील केवळ ३० टक्के रक्कम ग्राहकांना भरायची आहे.
- उर्वरित ७० टक्के रक्कम ही सहा हप्त्यांमध्ये भरायची आहे.
- तसेच घरगुती, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहक एकरकमी थकीत बिल भरतील, त्यांना दहा टक्के, तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे.

### ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

महावितरणने थकीत बिलामुळे कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपल्यानंतर ३१ डिसेंबरपर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन ही योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

### ... तर होणार कडक कारवाई

१ एवढ्या सवलती दिल्यानंतरही ग्राहकांनी वीज बिल भरण्यास टाळाटाळ केल्यास महावितरण विभागामार्फत ३१ मार्चनंतर गुन्हे दाखल करण्यासंदर्भात निर्णय घेणार आहे.

२ कायदेशीर व कडक कारवाईमुळे गुन्हे दाखल होतील, यात ग्राहकांना नाहक कायदेशीर बाबींचा त्रास सहन करावा लागेल. कोर्ट व पोलिस ठाण्यांच्या चकरा माराव्या लागतील.

### तीन कोटींच्या पुढे थकबाकी

बीड जिल्ह्यातील बीड शहर व अंबाजोगाई असे दोन विभाग असून या दोन्ही विभाग ३ कोटींपेक्षाही जास्त थकबाकी आहे. यापैकी सव्वा कोटींपर्यंत वसुली झाली आहे.

### थकबाकी न भरणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई

थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा येणार आहे. महावितरणने दिलेल्या सवलतींचा ग्राहकांनी लाभ घेऊन वीज बिल भरून टाकावे. अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. - पी.एम. राजपूत, अधीक्षक अभियंता, महावितरण.

# परळीला स्वतंत्र राष्ट्र घोषित करा, अन् धनंजय मुंडेंना पंतप्रधान करा

## जितेंद्र आव्हाड संतापले



मुंबई, (दिव्य न्युज):- अखेर वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात वाल्मिक कराडपूर्वी आठ जणांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. मात्र वाल्मिक कराड याच्यावर देखील कारवाई करावी अशी मागणी देशमुख कुटुंबाकडून सुरू होती. अखेर आज वाल्मिक कराड याच्यावर देखील कारवाई करण्यात आली आहे. वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई झाल्यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, यावर प्रतिक्रिया देताना ३०७ देखील दाखल करा अशी मागणी यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. पुढे बोलताना त्यांनी मंत्री धनंजय मुंडेंना देखील टोला लगावला आहे. परळीला स्वतंत्र राष्ट्र घोषित करा आणि धनंजय मुंडेंना तेथील पंतप्रधान घोषित करा. धनंजय मुंडेंचा राजीनामा क्रमप्राप्त होता. असा टोलाही यावेळी आव्हाड यांनी लगावला आहे. दरम्यान अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल का घेतली नाही? असा सवालही त्यांनी यावेळी केला. परळीत अजूनही अनेक पोलीस अधिकारी वाल्मीक कराड यानेच नेमलेले आहेत, असा आरोपीही यावेळी आव्हाड यांनी केला आहे.वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई झाल्यानंतर परळीमधील वातावरण चांगलंच तापलं आहे. परळीमध्ये आज सकाळपासूनच वाल्मिक कराड याच्या समर्थनार्थ कार्यकर्त्यांचं आंदोलन सुरू होतं. या आंदोलनात वाल्मिक कराड याची आई देखील सहभागी झाली होती. मात्र आंदोलनादरम्यान त्यांची प्रकृती खालावली, पाण्याच्या टाकीवर चढून समर्थकांनी आंदोलन केलं.त्यानंतर वाल्मिक कराड याच्यावर मकोका लावण्यात आल्याची बातमी समोर येताच समर्थक आधिक आक्रमक झाले. बेमुदत परळी बंदची हाक देण्यात आली आहे, टायर जाळून निषेध करण्यात आला. तसेच आंदोलकांकडून बसवर देखील दगडफेक करण्यात आली आहे. यामुळे वातावरण चांगलंच तापलं आहे, आता उद्या वाल्मिक कराड याला केज न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

पान ४ वरून

### आर.एन.डी.विद्यालयातून

सांगितले आणि जगण्याचा मंत्र सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना जागृत करण्याचे काम केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय खोटे यांनी संस्थेविषयी आणि भविष्यातील सर्व अडीअडचणी दूर करण्यासाठी विविध उपक्रम राबवत विद्यार्थ्यांना मोठ्या पदावर घेऊन जाण्यासाठी आम्ही त्यांना योग्य ते शिक्षण देण्याचा प्रयत्न करू असेही सांगितले तसेच पत्रकार प्राध्यापक सचिन पवार यांनी देखील मनोगत व्यक्त करताना महापुरुषांचे विचार आचरणात आणावेत आणि त्यांचा इतिहास वाचताना त्यांचे विचार घेताना त्यांनी केलेला संघर्ष हा डोळ्यासमोर ठेवून आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करत रहावे असे सांगितले त्याचबरोबर अनेक मान्यवरांनी देखील आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते सागर आप्पा धस, युवा उद्योजक महेश दादा हंबर्डे, माऊली आप्पा जरांगे, गोवर्धन सुळे कांतीलाल गिरी तर एक क्रमाचे अध्यक्ष म्हणून राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर एन डी उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मुगगांवचे माजी सरपंच संजयजी खोटे हे होते. तरी या कार्यक्रमासाठी रघुनाथ सुळे चेअरमन निवडुंगा, भीमराव सरोदे सर, प्राचार्य भवर सर, मुख्याध्यापक येटकळ सर, शिरसाट सर, कापसे सर, गिरी सर, प्राध्यापक अशोक पवार सर, लगड सर साळुंखे सर कटके सर, प्राध्यापक सचिन पवार, तांबारे सर, प्राध्यापक गजधने, प्राध्यापक महादेव वराड, प्राध्यापक माणिक वराड, इंगळे, शेषराव सुळे, त्रिंबक गाडे, नितीन थोरात यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेळके सर यांनी केले प्रस्ताविक भवर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन खोटे सर यांनी केले.

सेवापूर्ती कार्यक्रम

स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय मुगगांव चे लालासाहेब गोपाळराव वीर सर यांची सेवापूर्ती पूर्ण झाल्याने त्यांचा कार्यक्रम जिजाऊ जयंती निमित्त आयोजित करण्यात आला होता यावेळी उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यांनी केलेल्या तीस वर्षाच्या सेवेवर प्रकाश टाकताना मान्यवरांनी त्यांच्या कामाचं कौतुक केलं.

सागर धस यांच्याकडून वीर सरांच्या कार्याचे कौतुक!

स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुगगाव चे सेवानिवृत्त शिक्षक लालासाहेब गोपाळराव वीर यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमांमध्ये बोलताना सागर धस यांनी त्यांच्या तीस वर्षाच्या कार्यकाळाचा लेखाजोखा मांडला आणि त्यांच्या कार्याचे कौतुक केलं भविष्यामध्ये त्यांनी आता स्वतःचं आयुष्य जगावं असं ही त्यांनी या ठिकाणी नमूद केले.

### आरटीओ सुध्दा टिप्पर

परमिटसुद्धा रद्द केले जाणार आहे.

गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी येथील टोलनाक्यावरील मागील वर्षभरातील सीसीटीव्ही फुटेज पाहून टिप्परवर कारवाई केली जात आहे. मागील वर्षभराचे रेकॉर्ड काढून वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर मालकांना नोटिसा पाठविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. नोटीस मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आता आपले म्हणणे सादर करण्याचे संबंधितांना आदेशित करण्यात आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अद्यापपर्यंत एकाही टिप्पर मालकांनी आपले म्हणणे सादर केलेले नाही. पुढील दोन दिवसात टिप्पर मालकांनी आपले म्हणणे सादर केले नाही तर त्यांचे काहीच म्हणणे नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे नोटीस बजाविण्यात आलेल्यांना आपले म्हणणे वेळेत सादर करावे लागणार आहे

पान १ वरून

### आकावर लागला

आरोप केले आहेत.वाल्मिक कराडच्या आई पारुबाई कराड (वय.७५) या परळी पोलिस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलनाला बसल्या आहेत. यावेळी त्यांनी माझा मुलगा निर्दोष असल्याचं वक्तव्य केलं आहे. माझा लेक देवमाणूसशिवाय त्याला मुद्दाम या सर्व प्रकरणात अडकवलं जात असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

माझा लेक देवमाणूस

माध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, माझ्या लेकाला निर्दोष सोडावं ही माझी मागणी आहे. त्याच्यावर जे काही आरोप केले जात आहेत. ते सर्व खोटे आहेत. असं म्हणतानाच त्यांनी कोण क्षीरसागर आहे त्याला अटक करा आणि माझ्या लेकावरील गुन्हा मागे घ्या, अशी मागणी केली. तर सुरेश धस, संदीप क्षीरसागर आणि बजरंग सोनवणे हे विनाकारण माझ्या लेकाने काही गुन्हा केला नसताना मुद्दाम अडकवत आहेत.

माझा लेक देवमाणूस आहे हे सगळ्या परळीला माहिती आहे, त्यामुळे धस, सोनवणे आणि क्षीरसागर यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि माझ्या लेकाला निर्दोष सोडल्याशिवाय माझा जीव गेला तरी मी इथून उठणार नाही, असंही त्या यावेळी म्हणाल्या आहेत. तर आता वाल्मिक कराडचे समर्थक देखील आक्रमक झाले असून त्यांनी टायर जाळून आंदोलन करत आपला संताप व्यक्त केला. तसंच त्यांनी आता सामूहिक आत्मदहनाचा इशारा देखील सरकारला दिला आहे.

दरम्यान, सोमवारी (ता.१४) संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी तर वाल्मिक कराडवर केवळ खंडणीचा नव्हे तर हत्येचा गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी आक्रमक भूमिका घेतली आणि स्वत:ला संपवून घेण्याचा इशारा देत पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केलं. यानंतर प्रशासनाने समजूत काढल्यानंतर त्यांनी आपलं आंदोलन मागे घेतलं. शिवाय सीआयडीच्या तपासावर संशय व्यक्त केल्यामुळे आधीची सीआयडी बरखास्त करून नवी सीआयडी स्थापन करण्यात आली आहे.

### ‘आका’चा गेम

मुख्यमंत्र्यांनी भूमिका घेतली होती असेही त्यांनी म्हटले. देशमुख हत्या प्रकरणात एसआयटीने आता आपलं काम दाखवण्यास सुरुवात केली आहे. कायद्याच्या कचाट्यात जे जे सापडतील त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचा विश्वास सुरेश धस यांनी व्यक्त केला. आज केज कोर्टात काय झाले, याची माहिती नाही. परंतु देशमुख प्रकरणात कोणताही दोषी सुटणार नसल्याचे त्यांनी नमूद केले.

कराडचे वकील ॲड.सिद्धेश्वर ठोंबरे यांनी पोलीस कोठडी वाढवून देण्याच्या मागणीला विरोध केला. चौकशीसाठी पोलिसांना १५ दिवसांची कोठडी पुरेशी होती. सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आवाजाचा नमुनादेखील घेतला आहे. संपत्तीची माहिती घेण्यासाठी पोलीस कोठडीची गरज नाही. त्यामुळे न्यायालयीन कोठली द्यावी अशी मागणी कराडच्या वकिलाने केली. विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांनी मागितलेल्या खंडणीमध्ये वाल्मिक कराड यांचा कुठलाही संबंध नसल्याचा बचाव कराडच्या वकिलाने केला.

हत्या प्रकरणातील आरोपी घुले आणि कराड दोन्ही कोठडीत असताना समोरासमोर चौकशी का केली नाही असा प्रश्नही त्यांनी केला. कराड तपासाला सहकार्य करत आहेत मग आणखी पोलीस कोठडी कशासाठी हा मुद्दाही कराडच्या वकिलाने उपस्थित केला. बँक खात्याचे चौकशी करण्यासाठी तंत्रज्ञान आहे.आरोपीच्या चौकशीची गरज नसल्याचे त्यांनी सांगितले. याआधी वाल्मिक कराड यांची १४ गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. २९ नोव्हेंबरला धमकी दिली तर त्या दिवशी गुन्हा का दाखल केला नाही असा सवाल करत खंडणी मागितली मग पैसे दिल्याचे पुरावे सरकारी वकीलांकडे नसल्याचा युक्तिवाद कराडच्या वकिलांनी मांडला.

### आंदोलनाने वेठीस

अधिकाऱ्यांनी न्यायालयात सांगितले. खून प्रकरणात एसआयटीने वाल्मिकच्या चौकशीसाठी त्याचा ताबा मागितलेला आहे. जसेही वाल्मिकवर मकोका लागल्याची बातमी परळीत पसरली, तसे कराड समर्थक प्रचंड आक्रमक झालेले होते. वाल्मिकची पत्नी, आई आणि नातेवाईकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला.

त्यांचा (वाल्मिक कराड ) खंडणी आणि खून प्रकरणात कुठलाही सहभाग नाही पण आंदोलन आणि वेठीस धरून गुन्हा दाखल होणार असतील तर हे प्रकार चांगले नाहीत. जाणून बुजून कारवाई करायला लावणार असतील तरे हे थांबले पाहिजे.

पोलिस आणि सरकार अशी कारवाई कशामुळे करतंय, असे विचारले असता त्या म्हणाल्या- पूर्णपणे या प्रकरणात जातीयवाद केला जातोय. जातीवादाशिवाय दुसरा काहीही विषय नाही. गुन्हेगाराला जात नसते. पोलिसांना तपास करायचा असल्यास करावा पण जात मध्ये आणून तुम्ही काय साध्य करताय. ते दोषी नाहीयेत, अशी बाजू वाल्मिक कराडच्या पत्नीने माध्यमांसमोर मांडली.

परळी बंदवर बोलताना वाल्मिकच्या पत्नी म्हणाल्या.

परळी बंदवर बोलताना वाल्मिकच्या पत्नी म्हणाल्या, जर जातीयवादातून त्यांच्यावर मकोका लावण्यात आला असेल तर लोक परळी बंदमध्ये उतरतीलच ना.

वाल्मिक कराडचे वकील काय म्हणाले?

सरकारी वकिलांनी वाल्मिक कराड यांची १० दिवसांची पोलीस कोठडी पाहिजे, अशी मागणी केली होती. ज्यावेळी पहिल्यांदा त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते, त्यावेळी जे मुद्दे सांगून पोलीस कोठडी घेतली, तेच मुद्दे आताही सांगून पोलीस कोठडी मागितली गेली. परंतु न्यायालयाने सरकारी वकिलांना फटकारून त्यांची पोलीस कोठडी न देता त्यांना न्यायालयीन कोठडी दिली. त्यांच्यावर तूर्त तरी मकोका लागलेला नाही, असे वाल्मिकच्या वकिलांनी सांगितले.

### वाल्मिक कराडसाठी

आता कार्यकर्ते थेट रस्त्यावर उतरले आहेत, तसेच यावेळी महिला देखील मोठ्या प्रमाणात आक्रमक झाल्या असून त्यांनी अंगावर पेट्रोल टाकून आत्मदहनाचा प्रयत्न केला आहे.

याशिवाय वाल्मिक कराडच्या काही समर्थकांनी थेट पाण्याच्या टाकीवर चढून देखील आंदोलन केलं आहे. तसेच या आंदोलना दरम्यान एका आंदोलकाला चक्कर आल्याची देखील घटना घडली आहे. त्यामुळे आता परळीत वाल्मिक कराडच्या समर्थनार्थ प्रचंड गदारोळ माजला आहे.

वाल्मिक कराडवर मोक्का अंतर्गंत कारवाई करण्यात आल्यानं आता परळीमधील त्याचे समर्थक मोठ्या प्रमाणात आक्रमक झाले असल्याने त्यांनी परळी बंदची हाक दिली आहे. मात्र आज परळीमध्ये सर्व दुकानं बंद करण्यात आले आहेत, त्यामुळे सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे. याशिवाय आंदोलक देखील प्रचंड आक्रमक झाले आहेत.दरम्यान, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराडवर मोक्का लावण्यात आला आहे. तसेच वाल्मिक कराडच्या न्यायालयीन कोठडीत देखील १४ दिवसांची वाढ करण्यात आली आहे.

### ’मी यापुढे विधानसभा

निवडणूक लढवतात, हे राजकारण घातक आहे. जर विकासाला प्राधान्य मिळत नसेल व केवळ जाती पातीवर निवडणुका होत असेल, तर लोकांनी मला आतापर्यंत निवडून दिले त्यांचे आभार, पण मी आता यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही. मी माझा मुलगा, माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर याला सांगितले की, मी निवडणूक लढणार नाही, तुला लढायची असेल, तर बघ नाहीतर जय हिंद जय महाराष्ट्र,’ अशी घोषणा अब्दुल सत्तारांनी केली. त्यांच्या या घोषणेने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

### धनंजय मुंडेंनी राजीनामा

शांत बसणार नाही, असे संदीप क्षीरसागर यांनी म्हटले. वाल्मिक कराड हा माणूस इतरांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात पटाईत आहे. वाल्मिक कराड यांनी या प्रकरणात अटक होण्यासाठी वेळ घेतला. ते स्वत: सरेंडर झाले. वाल्मिक कराड याला अटक झाल्यानंतर संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या तपासाची सुई अडकल्यासारखी झालेली आहे. बाकी प्रशासन आणि पोलिसांचा तपास पळत आहे, असा आरोप संदीप क्षीरसागर यांनी केला. विष्णू चाटे याने संतोष देशमुख यांची हत्या केली. विष्णू चाटेचे कनेक्शन पूर्णपणे वाल्मिक कराड याच्याशी आहे. त्यामुळे वाल्मिक कराड याच्यावर ३०२ चा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी क्षीरसागर यांनी केली.

### जगदंब कॉलनीत

लागले आहेत. यामुळे परिसरातील नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असुन उघड्यावरील कचर्यामुळे नागरीक त्रस्त झाले आहेत. नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप येथील नागरीक करत आहेत.

अनेक दिवसापासून उचलण्यात न आलेला कचरा, तुंबलेल्या नाल्या यामुळे कॉलनीत घाणीचे साम्राज्य पसरले आहे. याचा परिणाम आरोग्यावर होत आहे.रस्त्यावर कचर्याचे मोठ मोठे ढीग जमा झाले असल्याचे दिसतात यामुळे परिसरातील नागरीकांना दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागत असुन त्याचा आरोग्यासही धोका निर्माण झाला आहे. स्वच्छतेचा जागर करणार्या पालिकेने किमान साफसफाईचे औदार्य दाखविले पाहिजे अशी रास्त अपेक्षा येथील नागरीकांची आहे.

### चालू बसचे उडाले

नसल्याने धोका टळला असला तरी अशा खराब गाड्या विद्यार्थ्यांसाठी ने-आण करण्यासाठी एस.टी महामंडळ वापरत असेल तर विद्यार्थ्यांच्या जीव धोक्यात असल्याचे मत पालक व्यक्त करत आहेत.

परिवहन विभागाच्या काही बस भंगार अवस्थेत निघाल्या आहेत. यामुळे चालकाच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. शिवाय भंगारात जाण्याऱ्या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या आणि विद्यार्थ्याच्या जीवाला धोका असतो. आज बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेच्या विद्यार्थ्यासाठी ने-आण करणारी बस भंगार अवस्थेत असणारी बस आहे. शिवाय भंगारात जाण्याऱ्या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या जीवाला धोका असतो. परिवहन विभाग याला गांभीर्याने घेताना दिसून येत नाही. भंगार, नादुरुस्त बस रस्त्यावर एसटी महामंडळाच्या भंगार बसेसचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर येत आहे. एसटी महामंडळाच्या भंगार आणि नादुरुस्त बसेसमुळे अनेक ठिकाणी अपघातांच्या घटना घडत आहेत. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडली जाणारी बस भंगार अवस्थेतलीच बस आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दररोज भंगार मधली बसच पाठवली जाते. या बस मधून विद्यार्थ्यांना जीवघेणा प्रवास सुद्धा करावा लागतो. कधी खिडकी नाही तर कधी त्या बसच्या खिडकीला काचे सुद्धा नाहीत. यामुळे लहान विद्यार्थी खिडकीमधून डोकावत सुद्धा असतात. परंतु आज शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडल्या जाणारे बसचे वरील छतच उडून गेले आहे. यामुळे आता विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचणार नाहीत. शाळेच्या होणाऱ्या नुकसानीस परिवहन मंडळ जबाबदार राहणार का यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून शाळेसाठी कधी बस येते तर कधी नाही यासाठी अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांना शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर यांनी तक्रार केली असता त्यांनी या तक्रारीला केराची टोपली दाखवल्याचे सुद्धा शाळेचे मुख्याध्यापक यांनी बोलताना म्हटले आहे. सतत शाळेसाठी भंगार बस आणि नादुरुस्त बसच पाठवली जाते. जर एखाद्या वेळेस शाळेसाठी येणारी बस ना दुरुस्त असेल भंगार असेल आणि या बसमधून विद्यार्थी जर प्रवास करत असतील तर दुर्घटना घडलीच तर परिवहन महामंडळ जबाबदार राहणार का ? विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानास कोण जबाबदार राहणार ? संबंधित अधिकारी नेमक ऐकते कोणाचे ? शाळेसाठी असल्या नादुरुस्त बस पाठवल्या तर विद्यार्थ्यांना या बस मधून जीव घेणा प्रवास करावा लागत आहे. एसटी महामंडळ अशा भंगार बसेस रस्त्यावर चालवून प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत आहे का?, असा संतप्त सवाल आता पुन्हा एकदा विचारल्या जाऊ लागला आहे. अशा बसेसमुळे प्रवाशांना आणि विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. भंगार बस रस्त्यावरून धावतात. त्यावर निर्बंध लावणे आवश्यक आहे.